DAY — 22 SEAT NUMBER

2022	III	30	1500	J-882	(M)

SOCIOLOGY (45)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) प्रश्नांच्या उजवीकडे पूर्ण गुण दिलेले आहेत.

(३) चार गुणांसाठी विचारलेल्या उपप्रश्नांच्या उत्तरांत किमान चार मुद्दे अपेक्षित आहेत.

(४) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

प्र. १. खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा : [२०]

(अ) खालील कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व ती पुन्हा लिहा : (५)

(१) श्वेतांबर आणि दिगंबर हे दोन ----- धर्मातील पंथ आहेत.

[हिंदू, बौद्ध, जैन]

(२) ५५% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या भारताच्या -------- विभागात आढळते.

[पश्चिम, मध्य, दक्षिण]

(३) भारताने -------- भाषासूत्र स्वीकारलेले आहे,

[दोन, तीन, चार]

(४) कामाच्या पद्धती सुरळीत बनवण्यासाठी संगणकीय प्रणालीचा उपयोग करण्यास -------- म्हणतात.

[औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, अंकीकृतकरण]

(५) 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश -------- दिला.

[डॉ. बी. आर. आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, महर्षी कर्वे]

https://www.maharashtrastudy.com

(ब) खालील जोड्यांपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून ती पुन्हा लिहा : (५)

(१) (i) अग्नी मंदिर — पारशी
(ii) लंगर — उत्सव
(iii) संगम काळ — तामिळनाडू आणि केरळ
(iv) उपनिषदे — हिंदू धर्म

(२) (i) वारली वर्षानृत्य — कंबाड नृत्य
(ii) ग्रामीण विकासासाठी घेतलेला पुढाकार — समुदाय विकास कार्यक्रम
(iii) राज्यकारभाराची त्रिस्तरीय व्यवस्था — एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम
(iv) सांडपाण्याची समस्या — शहरी समुदाय

(३) (i) भाषेवर आधारित संघर्ष — भाषावाद
(ii) धर्मावर आधारित संघर्ष — दहशतवाद
(iii) जातीवर आधारित संघर्ष — जातीवाद
(iv) प्रदेशावर आधारित संघर्ष — प्रदेशवाद

(४) (i) सती प्रतिबंधक अधिनियम — १९२९
(ii) विधवा पुनर्विवाह अधिनियम — १८५६
(iii) स्त्री भ्रूणहत्या अधिनियम — १८७०
(iv) द एज ऑफ कन्सेट ॲट मॅरेज ॲक्ट — १८९१

(५) (i) घरगुती हिंसा — कुटुंबांतर्गत अत्याचार
(ii) पीक वीमा — पीक उत्पादन वाढीसाठी वीमा
(iii) मानसिक आघात — मानसोपचार
(iv) पितृसत्ताक पद्धती — पुरुषी वर्चस्व

(क) चौकटीत दिलेल्या पर्यायांतून योग्य संज्ञा ओळखून ती दिलेल्या विधानापुढे लिहा : (५)

निसर्गवाद, आर्यसमाज, डॉ. बी. आर. आंबेडकर, अमली पदार्थ, डॉ. मनमोहन सिंग, ब्राम्हो समाज

(१) स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेली संघटना.
(२) सूर्य, अग्नी, जल इत्यादी निसर्गशक्तींची पूजा.
(३) यांच्यामुळे शारीरिक अस्वास्थ्याच्या समस्या येऊ शकतात.
(४) १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या वेळी भारताचे अर्थमंत्री.
(५) 'डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी'.

https://www.maharashtrastudy.com

(ड) अधोरेखित शब्दांच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा : (५)

(१) जालंदर या शहरात सुवर्ण मंदिर बांधले आहे.

(२) नवीन आर्थिक धोरण हे व्यवहारात BPL धोरण म्हणून ओळखले जाते.

(३) भारत छोडो ठराव १९३२ मध्ये पारित झाला.

(४) आदिम समुदायात जाती व्यवस्थेचे प्रभुत्व (वर्चस्व) आढळते.

(५) ज्यू धर्म बहुदेवतावादी आहे.

[८]

प्र. २. खालीलपैकी विषयांवर संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही दोन) : [८]

(१) भारतातील वसाहतवादाचे परिणाम

(२) चिपको आंदोलन

(३) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये

प्र. ३. खालीलपैकी फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : [१२] [१२]

(१) ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम धर्म

(२) ग्रामीण समुदाय आणि आदिवासी समुदाय

(३) जातीवाद आणि संप्रदायवाद

(४) भाषिक विविधता आणि प्रादेशिक विविधता

(५) भ्रमणध्वनीचे व्यसन आणि अमली पदार्थांचे व्यसन

प्र. ४. खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा (कोणतेही दोन) : [८]

(१) वर्णव्यवस्था https://www.maharashtrastudy.com

(२) आधुनिकीकरण

(३) अंकीकृतीकरण

प्र. ५. (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४) [१२]



(ब) खालील विधाने बरोबर की चूक हे सांगून सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन): (८)
(प्रत्येक उपप्रश्नास कोणतेही तीन मुद्दे)

(१) आर्थिक विषमतेचा समाजावर परिणाम होत नाही.

(२) जागतिकीकरणाने अनेक समस्या निर्माण केलेल्या आहेत.

(३) आधुनिक उद्योग नफा कमावण्याच्या तत्त्वावर आधारलेले आहेत.

P.T.O

https://www.maharashtrastudy.com

प्र. ६. (अ) खालील उतारा वाचून त्या खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (६) [१०]

पुणे येथील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कंपनीच्या धोरणनिर्मिती विभागाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यकारी समितीपुढे केलेले काल्पनिक भाषण वाचा :

''सुप्रभात, कंपनीच्या संचालक मंडळाने माझ्यावर एक काम सोपवले आहे. उच्च व्यवस्थापनाने घेतलेले काही धोरणासंबंधी निर्णय तुम्हांला सांगावयाचे आहेत. आपल्या कंपनीने दोन नवी धोरणे स्वीकारली आहेत. येत्या आर्थिक वर्षापासून कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनीय आणि दुहेरी-मूल्यमापन केले जाईल. प्रत्येक कर्मचाऱ्याचे मूल्यमापन त्याचे वरिष्ठ, गटातील सदस्य करतील. स्व-मूल्यमापनदेखील केले जाईल. कनिष्ठ कर्मचारीही त्यांच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करतील. मूल्यमापन काही निकषांच्या आधारे केले जाईल. कंपनीचे दुसरे धोरण पर्यावरणाशी संबंधित आहे. स्वच्छ आणि हरित पर्यावरणाची आंतरराष्ट्रीय बांधिलकी पाहता, कंपनीचे प्रत्येक काम आता 'पर्यावरणस्नेही' स्वरूपाचे असेल. ई-पोर्टलच्या माध्यमातून तुमच्या संबंधित विभागातील सदस्यांना कृपया तुम्ही हा निर्णय सांगा. सर्व कर्मचाऱ्यांची यावरची प्रतिक्रिया स्वागतार्ह आहे. परंतु, ई-पोर्टलच्या माध्यमातून अशी प्रतिक्रिया मानव संसाधन विभागाकडे देण्यासाठी आजपासून केवळ एक आठवड्याचा कालावधी आहे.''

(१) संचालक मंडळाने स्वीकारलेले धोरण कसे फायदेशीर आहे?

(२) तुम्ही तुमच्या समुदायात पर्यावरणस्नेही धोरणास कोणत्या मार्गांनी चालना देऊ शकता?

(ब) आपले व्यक्तिगत मत (प्रतिसाद) नोंदवा (कोणतेही <u>एक</u>) : (४)

(१) समाज सुधारणेच्या चळवळी २१ व्या शतकातसुध्दा भारतात सुरूच आहेत.

(२) वृद्धांच्या समस्या दूर करण्यासाठी उपाय सुचवा.

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे सविस्तर उत्तर १५० ते २०० शब्दांमध्ये लिहा : [१०]

(१) शहरी समुदायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यापैकी कोणत्याही पाच समस्या सविस्तरपणे स्पष्ट करून त्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचवा.

(२) व्यसनाधीनतेचे विविध प्रकार आहेत त्यांची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com